(13)

विद्या प्रतिष्ठान
एम.आय.डी.सी. (निवासी विभाग)
विद्यानगरी, बारामती (पुणे) ४१३१३३.
आवक क्र.:-1316
दिनांक :- 30-9-03

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुवि/९३५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 22 SEP 2003

प्रति,
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक व्हीएसएल- १००३/(५५७/२००३)/प्राशि-३, दिनांक ७ ऑगस्ट २००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि. पुणे. | भिगवण, जि. पुणे. | इंग्रजी | १ ली |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा ज्यादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता.)

| SECRETARY | |
|---|---|
| REGISTRAR | |
| OFFICE SUPDT. | |

स्वाक्षरीत शि. उ. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

Bhigwan 413105 Indapur

प्रत माहितीसाठ सविनय सादर.
१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.